माहितीचा अधिकार

ISO 9001:2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र
जा.क्र.नासुके/१/कावि/ ६३ /२०१६
दि.१६ /०२/२०१६

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ मधील तरतूदींच्या अंमलबजावणीबाबत. . .

परिपत्रक,

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४(१)(क) मधील तरतूदीनुसार माहितीचा अधिकार मिळणे सोयीचे होईल अशा रीतीने आणि स्वरुपात अभिलेख सुचिबध्द करणे, त्याची निर्देशसूची तयार करणे आणि ज्याचे संगणकीकरण करणे योग्य आहे अशिलेख्याचे संगणकीकरण करणे व ते देशातील विविध प्रणालींमध्ये नेटवर्कमार्फत जोडणे आवश्यक आहे. अधिनियमातील कलम ४ (१)(ख) मध्ये दर्शविलेल्या १७ बाबींवरील माहिती सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी तयार करुन ती प्रसिध्द करणे अनिवार्य आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्जदारांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने दरवर्षी किमान दोन वेळा आणि अधिकारी संदर्भातील जसे बदल्यांविषयक माहिती वेळोवेळी अद्ययावत करणेबाबत क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२५२/१५) सहा. दि.२८/०१/२०१६ या परिपत्रकान्वये शासनाने आदेशित केले आहे.

सबब या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुख / प्रथम अपिलीय अधिकारी / जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे कि, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्जदारांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने दरवर्षी १ जानेवारी व १ जुलै रोजी असे वर्षातून किमान दोन वेळा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील (www.pcmcindia.gov.in) माहिती अद्ययावत करावी. अधिकारी / कर्मचारी संदर्भातील, बदल्यांविषयक माहिती वेळोवेळी अद्ययावत केली जावी. माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दर्शविली जाईल याबाबत सर्व विभागप्रमुखांनी खातरजमा करावी. याबाबत तांत्रिक अडचणी उद्भवल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाशी तातडीने संपर्क साधून निराकरण करावे.

(राजीव जाधव)
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

विभागप्रमुख / प्रथम अपिलीय अधिकारी / जन माहिती अधिकारी,
सर्व विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

प्रत,

माहिती व तंत्रज्ञान विभाग